**<u>ठळक बातम्या</u>**

- बिहार विधानसभा निवडणुकीसाठी रालोआचं जागावाटप निश्चित; भाजपा आणि जदयू प्रत्येकी १०१ जागा लढवणार

- कायदेमंडळ, मंत्रिमंडळ आणि न्यायपालिका या प्रशासनाच्या तिन्ही स्तंभांनी एकमेकांविरोधात काम करू नये, असं सरन्यायाधीशाचं प्रतिपादन

- गाझामध्ये सुरू असलेलं युद्ध संपवण्यासाठीच्या कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी उद्या इजिप्त इथं आंतरराष्ट्रीय शांतता बैठक

**आणि**

- भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यानच्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजवर फॉलो ऑनची नामुष्की

<><><><><><>

बिहार विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागावाटप निश्चित झालं आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. भारतीय जनता पक्ष आणि संयुक्त जनता दल प्रत्येकी १०१ जागांवर निवडणूक लढवतील, तर लोक जनशक्ती पक्ष रामविलास या पक्षाला २९ जागा दिल्या आहेत. राष्ट्रीय लोक मोर्चा आणि हिंदुस्थानी आवाम मोर्चा हे पक्ष प्रत्येकी ६ जागांवर उमेदवार उतरवतील. बिहार विधानसभेच्या २४३ जागांसाठी ६ आणि ११ नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांमध्ये मतदान होणार असून मतमोजणी १४ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

<><><><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये होणाऱ्या राज्यसभा निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षानं तीन उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली. त्यात गुलाम मोहम्मद मीर, राकेश महाजन आणि

सत्पाल शर्मा यांचा समावेश आहे. जम्मू काश्मीरमधे राज्यसभेच्या चार जागांसाठी येत्या २४ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><><>**

कायदेमंडळ, मंत्रिमंडळ आणि न्यायपालिका हे प्रशासनाचे तिन्ही स्तंभ देशाच्या नागरिकांना न्याय देण्यासाठीच काम करतात, त्यांचं अधिकारक्षेत्र स्वतंत्र असलं, तरी त्यांनी एकमेकांच्या विरोधात काम करू नये, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आज केलं. रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड इथं दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाचं उद्घाटन न्यायमूर्ती गवई यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या काही काळात न्यायपालिकेच्या विविध पायाभूत सुविधांच्या विकासात राज्य सरकारची भूमिका मोठी आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

मंडणगडचं नवं न्यायालय हे सुमारे चार ते साडेचार लाख लोकांना मध्यवर्ती पडेल, त्यामुळे त्यांचा प्रवास आणि पैसे वाचतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या न्यायालयाद्वारे फक्त इमारत नाही, तर न्यायदानाची गतिशील व्यवस्था तयार झाल्याचं ते म्हणाले. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं मूळ गाव ज्या मंडणगड तालुक्यात आहे, तिथं न्यायालय उभं राहणं, हा बाबासाहेबांच्या वारशाचा गौरव आहे, असं मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर म्हणाले.

राज्यात अनेक ठिकाणी नवी न्यायालयं बांधली जात असून न्यायपालिकेचं नेतृत्व आणि शासनाची इच्छाशक्ती एकत्र आली, की न्याय नागरिकांच्या दारी पोहोचतो, असं मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलं. राज्याचे उद्योगमंत्री आणि रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, कोल्हापूर सर्किट बेंचचे मुख्य प्रशासकीय न्यायाधीश न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, बार असोसिएशनचे सदस्य आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

देशातले ५२ लाखापेक्षा जास्त शेतकरी आता अकराशेपेक्षा जास्त कृषी उत्पादन संघटनांशी जोडलेले असून याद्वारे त्यांच्या पिकाला चांगली किंमत मिळत असून उत्पादकताही वाढली आहे, असं कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. या सर्व संघटनांची उलाढाल १५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये, एका खासगी वैद्यकीय महाविद्यालयातल्या विद्यार्थिनीवर झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणातल्या तीन आरोपींना दुर्गापूर न्यायालयानं आज दहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. पीडित विद्यार्थिनी ओदिशा इथली असून, ती गेल्या शुक्रवारी आपल्या मैत्रिणीसोबत महाविद्यालयाच्या परिसराबाहेर गेली होती. त्यावेळी तिच्यावर सामूहिक बलात्कार झाला. दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी महिलांच्या सुरक्षिततेवरून केलेल्या वक्तव्यावर टीका होत आहे.

<><><><><>

तेलंगणात कामारेड्डी जिल्ह्यात पोलिसांनी बनावट चलन रॅकेट उघडकीला आणलं आहे. याप्रकरणी १२ जणांच्या आंतरराज्यीय टोळीतल्या आठ जणांना बिहार आणि पश्चिम बंगालसह विविध राज्यांतून अटक केली. त्यांच्याकडून तीन लाख रुपयांपेक्षा अधिक मूल्याचं बनावट चलन जप्त केलं.

<><><><><>

गाझामध्ये सुरू असलेलं युद्ध संपवण्यासाठीच्या कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी उद्या इजिप्त इथं आंतरराष्ट्रीय शांतता बैठक भरणार आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फतह एल सिसी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. यूकेचे प्रधानमंत्री किएर स्टार्मर, संयुक्त राष्ट्रसंघाचे

सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्यासह २०पेक्षा जास्त देशांचे नेते या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. गाझापट्टीतलं युद्ध संपवणं, तसंच पश्चिम आशियात शांतता आणि स्थैर्य पुनर्स्थापित करायचे प्रयत्न वाढवणं असा या बैठकीचा उद्देश असल्याचं इजिप्तच्या अध्यक्षांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. विशेष बाब म्हणजे, या चर्चेत इस्रायल, हमास किंवा पॅलेस्टाइन यांच्यापैकी कोणीही सहभागी होणार नाही.

<><><><><><>

अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारनं पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या हल्ल्यात पाकिस्तानी लष्कराचे ५८ जवान ठार झाले. अफगाणिस्तानातल्या पक्तिका प्रांतातल्या एका बाजारपेठेवर पाकिस्ताननं केलेल्या हवाई हल्ल्याचं प्रत्युत्तर म्हणून हा हल्ला केल्याचं अफगाणिस्ताननं म्हटलं आहे. अफगाणिस्ताननं सीमावर्ती भागात केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानचे ३० जवान जखमी झाल्याची, तालिबानचे ९ सदस्य ठार झाल्याची आणि सुमारे १८ जण जखमी झाल्याची माहिती तालिबानचे प्रवक्ते झबिउल्ला मुजाहिद यांनी दिली.

<><><><><><>

संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेत सहभाग असलेल्या देशांच्या प्रमुखांची परिषद १४ ऑक्टोबरपासून नवी दिल्लीत सुरू होणार असून भारतीय लष्कर या परिषदेच्या यजमानपदी आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, शांती मोहिमांसाठीचे उपमहासचिव झाँ-पीएर लाक्र्वा यांच्यासह इतर मान्यवर या परिषदेत विविध सत्रांना संबोधित करतील.

<><><><><><>

एनएसजी, अर्थात राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांच्या २६व्या विशेष तुकडीनं आज मुंबईत २००८मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले मेजर संदीप उन्नीकृष्णन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सायक्लोथॉन आयोजित केली होती. ‘एनएसजी’

च्या स्थापना दिनाची औपचारिक सुरुवात करून, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करणं आणि 'फिट इंडिया' चळवळीला प्रोत्साहन देणं, हे या सायक्लोथॉनचं उद्दिष्ट आहे. एनएसजीच्या या उपक्रमात अडीचशेपेक्षा जास्त व्यावसायिक सायकलस्वार सहभागी झाले होते.

**<><><><><><>**

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज विशाखापट्टणम इथं भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात लढत सुरू आहे. भारतानं प्रथम फलंदाजी करताना ४८ षटकं, ५ चेंडूत ३३० धावा केल्या. भारताकडून स्मृती मंधानानं ८०, तर प्रतीका रावळनं ७५ धावांची दमदार खेली केली. एका वर्षांत एकदिवसीय क्रिकेटमध्ये एक हजार धावा करणारी पहिली महिला क्रिकेटपटू हा मान स्मृतीनं मिळवला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या १८ षटकांत एक गडी बाद ११४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><><>**

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान नवी दिल्लीत सुरू असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजवर फॉलोऑनची नामुष्की आली. कुलदीप यादव याच्या भेदक माऱ्यामुळे वेस्ट इंडिजला पहिल्या डावात फक्त २४८ धावा करता आल्या.

तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी कालच्या चार गडी बाद १४० या धावसंख्येवरून खेळायला सुरुवात केली. रविंद्र जडेजानं तीन तर जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी एक गडी बाद केले.

भारतानं पहिल्या डावात कर्णधार शुभमन गिल नाबाद १२९ आणि यशस्वी जयस्वालच्या १७५ धावांच्या बळावर पाच गड्यांच्या मोबदल्यात ५१८ धावांवर डाव घोषित केला.

**<><><><><><>**

येत्या २ दिवसांमध्ये महाराष्ट्रातल्या कोकणात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून विदर्भात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात १५ ऑक्टोबरनंतर वादळी पाऊस पडेल असा अंदाज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना पावसापासून सुरक्षित ठेवण्याचं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**//<><><><><><>//**